३५) **वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभेची गणपूर्ती :**

१) कोणत्याही सर्वसाधारण सभेस एकूण सभासदांमधील १/५ सभासद किंवा ३०० सभासद यापैकी जी संख्या कमी असेल इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल.

२) साधारण सभेचे कामकाज सभेच्या वेळेस गणपूर्ती न झाल्यास चालविण्यात येणार नाही.

३) ठरविण्यात आलेल्या वेळेस गणपूर्ती झाली नाही तर सगा तहकूब करण्यात येईल आणि ती अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

४) सभेच्या दरम्यान कोणत्याही वेळी असे लक्षात आले की, गणपूर्तीसाठी आवश्यक तेवढे सभासद उपस्थित नाहीत तर अध्यक्ष किंवा सभेचे अध्यक्ष स्थान भुषविणारी व्यक्ती अशी सभा तहकूब करेल आणि उर्वरित कामकाज नेहमीच्या पध्दतीने तहकूब सभेत पूर्ण केले जाईल.

५) वरील क्रमांक ३ व ४ नुसार तहकूब केलेली सभा त्याचदिवशी अथवा अन्य कोणत्याही दिवशी, कोणत्याही ठिकाणी व कोणत्याही वेळेस ७ दिवसांचे आत अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे घेण्यात येईल.

६) तहकूब झालेल्या सभेमध्ये सभेच्या सुचनेवर असलेल्या विषयाव्यतिरिक्त कोणत्याही विषयाचे कामकाज चालविले जाणार नाही.

७) तहकूब झालेल्या सभेमध्ये गणपूर्ती नसेल तरीही सभेचे नियमीत कामकाज पार पाडता येईल.

८) विशेष सर्व साधारण सभेसाठी एकूण सभासदांमधील १/५ सभासद किंवा ३०० सभासद यापैकी जी संख्या कमी असेल इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल.

९) सभासदांनी मागणी केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी मात्र जितक्या सभासदांनी मागणीवर स्वाक्षऱ्या केल्या असतील त्या सभासदापैकी निम्म्यापेक्षा जास्त सभासद हजर असल्याशिवाय गणपूर्ती (कोरम) झाली असे समजणेत येणार नाही.

३६) **सर्व साधारण सभेचे अध्यक्ष :**

संचालक मंडळाचे अध्यक्ष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष असतील. त्यांचे गैरहजेरीत उपाध्यक्ष आणि दोघांचेही गैरहजेरीमध्ये हजर असलेले व मतदानाचा हक्क असलेले सभासद आपल्यापैकी एकाची निवड सभेच्या अध्दयक्षपदासाठी करतील.

३७) **ठराव :**

ज्याबाबत विशिष्ट तरतूदी, कायदा नियम व पोटनियम असतील असे विषय वगळता इतर बाबतीत ठराव मताधिक्क्याने मंजूर करण्यात येईल.